# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ०६ / २००९.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १३/०८/२००९.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०६ , दिनांक २१/०८/२००९.**

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य / सदस्या,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शुक्रवार दिनांक २१/०८/२००९ रोजी दुपारी १.०० वाजता** नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक ०६ दिनांक २१/०८/२००९ रोजी दुपारी १-०० वाजता होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| २७ | दुखवटयाचे प्रस्ताव. |
| २८ | राज्य वेतन सुधारणा समिती २००८ शिफारशी स्विकृत करणे बाबत मा.सर्वश्री.संजय बाबुराव गाडे,सभापती, स्थायी समिती, बाळासाहेब रेवजी पवार, पोपटराव जगन्नाथ बारस्कर, सौ.रजनी अरविंद शिंदे, सुभाष सोपानराव लोंढे, अनिल गणपत शेकटकर मोहन भागवत कदम, सुरेश नारायण आंबेकर, सौ.सोनाबाई शिंदे सभापती महिला व बालकल्याण समिती, सौ.स्मिता ठाकर उपसभापती महिला व बालकल्याण समिती, गणेश उर्फ उमेश कवडे, सौ.मुक्ताबाई मिसाळ, श्रीमती.गंभीर इंदरकौर, शेंडगे संजय इत्यादी मा.सदस्य यांनी दिलेल्या यादीप्रमाणे प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| २९ | अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या पिंपळगांव तलाव येथील जागेमध्ये खाजगी करणाच्या माध्यमातुन नौकानयन सुरु करणे व त्याकरीता निविदा मागविणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| ३० | विकास योजना अहमदनगर (वाढीव क्षेत्र), मुकुंदनगर, मौजे भिंगार सर्व्हे नंबर ३२९/१ मधील विद्यमान बाबे आखेरत कब्रस्तान विकास योजना नकाशात दर्शविणे तसेच मा.सर्वश्री.हाजी शेख नजीर मोहम्मद नसीर, उपमहापौर, मा.श्री.संजय गाडे, सभापती स्थायी समिती, शेख अय्युब चाँद, खान समद वहाब मा.सदस्य व मुकुंदनगर येथील नागरिकांचे निवेदन बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| ३१ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

सही/-
नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : १३/०८/२००९.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २७** **दिनांक : २१/०८/२००९.**

---

**प्रस्तावाचा विषय :** दुखवटयाचे प्रस्ताव.

सभा क्रमांक ०६ दिनांक २१/०८/२००९ रोजी दुपारी १-०० वाजता होणा-या मा.सर्वसाधारण सभे पुढे प्राप्त झालेले दुखवटयाचे प्रस्ताव.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| १ | कै.हिराबाई वासुदेवदास गांधी यांचे दु:खद निधना निमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | कै.मुकुंद बोज्जा यांचे दु:खद निधना निमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | कै.हरुमल हिरानंदानी (सर) यांचे दु:खद निधना निमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | कै.सत्यभामा रामा गाडे यांचे दु:खद निधना निमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ५ | कै.सदाशिव विठ्ठल दारकुंडे यांचे यांचे दु:खद निधना निमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | कु.श्रध्दा दिलीप आव्हाड हिचे दु:खद निधना निमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

**ठराव :-** दोन मिनीटे स्तब्ध उभेराहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २८** **दिनांक : २१ /०८/२००९.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** राज्य वेतन सुधारणा समिती २००८ शिफारशी स्विकृत करणे बाबत मा.सर्वश्री.संजय बाबुराव गाडे,सभापती, स्थायी समिती, बाळासाहेब रेवजी पवार, पोपटराव जगन्नाथ बारस्कर, सौ.रजनी अरविंद शिंदे, सुभाष सोपानराव लोंढे, अनिल गणपत शेकटकर मोहन भागवत कदम, सुरेश नारायण आंबेकर, सौ.सोनाबाई शिंदे सभापती महिला व बालकल्याण समिती, सौ.स्मिता ठाकर उपसभापती महिला व बालकल्याण समिती, गणेश उर्फ उमेश कवडे, सौ.मुक्ताबाई मिसाळ, श्रीमती.गंभीर इंदरकौर, शेंडगे संजय इत्यादी मा.सदस्य यांनी दिलेल्या यादीप्रमाणे प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

मा. केंद्र शासनाने सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफ़ारशीच्या आधारे केंद्रीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीत दिनांक १ जानेवारी २००६ पासुन सुधारणा करण्याचा निर्णय घेतलेला होता. सदर निर्णयाच्या आधारे राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने शिफ़ारशी करण्यासाठी मा.शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर-१२०८/प्र.क्र.७२/सेवा-९ दिनांक २३ सप्टेबंर २००८ अन्वये मा. श्री. हकीम, सेवानिवृत्त सचिव, केंद्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती २००८ ची स्थापना करण्यांत आलेली होती. सदर समितीने दिनांक २० सप्टेबंर २००८ रोजी मा. शासनास अहवाल सादर केला असता सदर अहवालातील शिफ़ारशी स्विकृत करण्याचा प्रस्ताव मा. शासनाच्या विचाराधीन होता.

१. मा.शासन निर्णय,वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक वेपुर-१२०९/ प्र.क्र.२०/ सेवा -९ दिनांक २७ फ़ेब्रुवारी २००९ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती २००८ शिफ़ारशी स्विकृत करणे बाबत निर्णय घेतलेला आहे. (सोबत मा. हकीम समितीने केलेल्या शिफ़ारशी व मा. शासनाने स्वीकृत केल्याबाबतचे परिशिष्ठ)

२. मा. शासनाने स्विकृत केलेल्या परिच्छेद क्र. ३:२:१ तक्त्यामध्ये खालील प्रमाणे सुधारीत संरचना व समुचित ग्रेड वेतन नमुद केलेले आहे.

| तक्ता क्रमांक ३:१ राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी सुधारीत वेतन संरचना | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र | दिनांक १-१-९६ पासुन विहित वेतनश्रेणी (रुपये) | शिफ़ारस केलेल्या वेतन बॅड क्रमांक | शिफ़ारस केलेली सुधारीत वेतन संरचना | |
| | | | वेतन बॅड (रु) | ग्रेड वेतन(रु) |
| १ | २५५०-३२०० | १ एस | ४४४०-७४४० | १३०० |
| २ | २६१०-४००० | १ एस | ४४४०-७४४० | १६०० |
| ३ | २६५०-४००० | १ एस | ४४४०-७४४० | १६५० |
| ४ | २७५०-४४०० | पीबी १ | ५२००-२०२०० | १८०० |
| ५ | ३०५०-४५९० | पीबी १ | ५२००-२०२०० | १९०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | ३२००-४९०० | पीबी १ | ५२००-२०२०० | २००० |
| ७ | ४०००-६००० | पीबी १ | ५२००-२०२०० | २४०० |
| ८ | ४५००-७००० | पीबी १ | ५२००-२०२०० | २८०० |
| ९ | ५०००-८००० | पीबी २ | ९३००-३४८०० | ४२०० |
| १० | ५५००-९००० | पीबी २ | ९३००-३४८०० | ४३०० |
| ११ | ६५००-१०५०० | पीबी २ | ९३००-३४८०० | ४४०० |
| १२ | ७४५०-११५०० | पीबी २ | ९३००-३४८०० | ४६०० |
| १३ | ७५००-१२००० | पीबी २ | ९३००-३४८०० | ४८०० |
| १४ अ | ८०००-१३५०० (गट अ पुर्वीचा वर्ग-२) | पीबी २ | ९३००-३४८०० | ५४०० |
| १४ ब | ८०००-१३५०० (गटअ पुर्वीचा वर्ग-१) | पीबी ३ | १५६००-३९१०० | ५४०० |
| १५ | १००००-१५२०० | पीबी ३ | १५६००-३९१०० | ६६०० |
| १६ | १०६५०-१५८५० | पीबी ३ | १५६००-३९१०० | ६६०० |
| १७ | १२०००-१६५०० | पीबी ३ | १५६००-३९१०० | ७६०० |
| १८ | १४३००-१८३०० | पीबी ४ | ३७४००-६७००० | ८७०० |
| १९ | १५१००-१८३०० | पीबी ४ | ३७४००-६७००० | ८७०० |
| २० | १६४००-२०००० | पीबी ४ | ३७४००-६७००० | ८९०० |
| २१ | १६४००-२०९०० | पीबी ४ | ३७४००-६७००० | ८९०० |
| २२ | १८४००-२२४०० | पीबी ४ | ३७४००-६७००० | १०००० |
| २३ | २२४००-२४५०० | पीबी ४ | ३७४००-६७००० | १२००० |

३. अहमदनगर महानगरपालिकेमधील पात्र कायम कर्मचा-यांना मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक नगर पालिका प्रशासन १०९९/९९/प्र. क्र.१५९/९८/नवि-१६ दिनांक ४ एप्रिल २००० अन्वये तत्कालीन नगरपरिषद असतांना दिनांक १-१-९६ पासुन ५ व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी नगर परिषद ठराव नं. ३८ (अ) दिनांक १२-५-२००० च्या मंजुरीने मा. जिल्हाधिकारी यांचेकडील आदेश क्र. नपा / कार्या/६३५/२३५/२००० दिनांक १७-१०-२००० अन्वये आस्थापना कायम सुचीवरील कर्मचा-यांना लागु करण्यांत आलेल्या आहेत.

४.अहमदनगर महानगरपालिकेमध्ये सध्या अस्तित्वात असलेली पदांची संख्या.

| | वर्ग १ | वर्ग २ | वर्ग ३ | वर्ग ४ | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १४९० पैकी मुळ आस्थापना सुची | ५ | ४ | ५०४ | ९७७ | १४९० |
| ५०० कोर्ट कर्मचारी (मा. शासनाचे दिनांक ५-३-०१ नुसार मंजुर) | --- | --- | २० | ४८० | ५०० |
| ३४१ ग्रामपंचायत वर्ग | --- | --- | ४८ | २९३ | ३४१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १११ प्राधिकरण वर्ग | --- | --- | ५० | ६१ | १११ |
| ३०५ कोर्ट मंजुरी | --- | --- | --- | ३०५ | ३०५ |
| ३५ मलेरिया | --- | --- | ११ | २४ | ३५ |
| बाल विकास प्रकल्प | --- | --- | ५ | --- | ५ |
| कुंटूब माता बाल संगोपन | --- | --- | १३ | १ | १४ |
| पद नामंजुर मात्र नपा ॲवार्डनुसार कार्यरत कर्मचारी | --- | --- | --- | ७६ | ७६ |
| | ५ | ४ | ६५१ | २२१७ | २८७७ |

५.अहमदनगर महानगरपालिकेमधील पद संख्यानुसार वेतनश्रेणी पदनामा बाबत माहिती खालील प्रमाणे

| अ. नं | ५ व्या वेतन आयोगानुसार मंजुर वेतनश्रेणी | ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | पदसंख्या | ग्रेड पे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ०१ | ६६०० |
| २ | १००००-१५२०० | १५६००-३९१०० | ०२ | ६६०० |
| ३ | ८०००-१३५०० | ९३००-३७८००<br>(गट अ- पुर्वीचा वर्ग २)<br>१५६००-३९१००<br>(गट अ- पुर्वीचा वर्ग १) | १७ | ५४००<br><br>५४०० |
| ४ | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ०४ | ४६०० |
| ५ | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ३१ | ४४०० |
| ६ | ५५००-९००० | ९३००-३४८०० | १९ | ४३०० |
| ७ | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ५८ | ४२०० |
| ८ | ४५००-७००० | ५२००-२०२०० | १७ | २८०० |
| ९ | ४०००-६००० | ५२००-२०२०० | ८२ | २४०० |
| १० | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २६ | २००० |
| ११ | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | ४५४ | १९०० |
| १२ | २७५०-४४०० | ५२००-२०२०० | ४८ | १८०० |
| १३ | २६५०-४००० | ४४००-७४४० | १२६ | १६५० |
| १४ | २६१०-४००० | ४४००-७४४० | ७५२ | १६०० |
| १५ | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | ११६४ | १३०० |
| १६ | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | ७६ | १३०० |

६. अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, नागरी हिवताप योजने अंतर्गत ३५ मलेरिया कर्मचा-यांनी तसेच एकात्मिक बाल विकास प्रकल्प योजने अंतर्गत ५ कर्मचारी, कुंटूब माता बाल संगोपन १४ यांच्या वेतनावर १००% अनुदान मा. शासनाकडुन प्राप्त होते.

७.तत्कालीन नगर परिषद असतांना मा. औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे रोजदांरीवरील कर्मचा-यांना कायम करणेचे आदेश दिल्यामुळे तत्कालीन नगर परिषदेने रोजदांरीवरील कर्मचा-यांना कायम नेमणूक आदेश देण्यांत आलेले होते. तत्कालीन अहमदनगर नगरपरिषद व कामगार युनियन यांचे मध्ये झालेल्या अॅवार्डनुसार सेवानिवृत्त झाल्यानंतर कर्मचा-यांच्या वारसांना वारस नोकरी देणे बाबत पध्दती अंवलबिण्यांत येत होती. तत्कालीन नगर परिषदेमध्ये एकुण ७८ कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे वारस अॅवार्डनुसार वारस नोकरी देण्यांत आलेली आहे. सध्या असे ७६ कर्मचारी कार्यरत आहेत. सदर कर्मचा-यांच्या पदांना मा. शासनाकडुन अद्याप पर्यंत मंजुरी मिळालेली नाही. सदर नामंजुर पदांवरील कार्यरत कर्मचा-यांच्या पदांना मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने पाठविण्यांत आलेला आहे. सदर कर्मचा-यांनी मा. औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे पाचव्या वेतन आयोगाच्या शिफ़ारशी प्रमाणे वेतनश्रेणी मिळणे बाबत केस नं (यु एल पी) ७३/०२ अन्वये दाखल केली आहे. याबाबत मा. औद्योगिक न्यायालय यांनी दिनांक १-१-९६ पासुन वेतनश्रेणी देणे बाबत आदेश दिलेले होते. या निर्णया विरुध्द मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपिठ रिट पिटीशन नं. ४०६१/२००५ अन्वये रिट पिटीशन दाखल केलेली होती. सदर आदेशाबाबत कामगार युनियन प्रतिनिधी व कामगार यांचे समवेत तडजोड होवुन कर्मचा-यांचे प्रतिज्ञापत्र घेवुन सदर आदेशानुसार संबधीत कर्मचा-यांना दिनांक १-४-२००६ पासुन पाचव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करुन पाचव्या वेतन आयोगानुसार वेतन अदा करण्यांत येत आहे.

८. मा. शासन निर्णय दिनांक २७-२-२००९ नुसार सुधारीत सरंचना समितीच्या शिफ़ारशीची अंमलबजावणी दिनांक १-१-२००६ पासुन केल्यास परिणाम स्वरुप होणा-या वेतनाची थकबाकी अदा करावी लागेल. थकबाकीची वित्तीय भाराची परिगणना सन २००६ साठी तसेच दिनांक १-१-२००६ ते ३१-३-२००९ या कालावधीसाठी तसेच सन २००९-२०१० या वित्तीय वर्षातील खर्चाची परिगणना करण्यांत आलेली आहे.

९. वेतन बॅड व ग्रेड वेतनावर आधारीत सुधारीत वेतन संरचनेची अंमलबजावणी करण्यासाठी २००९-२०१० मध्ये ६,५१,००,०००/- (सहा कोटी एक्कावन्न लाख मात्र) इतका वार्षिक वाढीव खर्च अपेक्षित आहे. सदरचा वाढीव खर्च आस्थापना सुचीवरील सर्व पदे म्हणजे २८७७ विचारात घेवुन सहाव्या वेतन आयोगातील ग्रेड वेतनावर निर्धारीत करुन काढण्यांत आला आहे. साधारणतः प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांचे वेतनात ग्रेड पे ची वाढ झालेली दिसते त्यानुसार रु. ५,८१,००,०००/- वाढ अपेक्षित असुन रु. ६९,००,०००/- हा खर्च महागाई भत्ता, वार्षिक वेतन वाढ इत्यादी विचारात घेवुन दर्शविण्यांत आला आहे असा एकदंरीत रु. ६५१,००,०००/- इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे.

१०. कोर्ट केस ५०६ मधील कर्मचा-यांना शासन निर्णय क्र. नं. सं. ई. १०२०/ प्र. क्र. ५१९/२०००/७ दिनांक ५-३-०१ रोजी मनपा सेवेत सामावुन घेण्यास मान्यता दिलेली आहे. परंतु ही पदे सेवानिवृत्ती व इतर कोणत्याही कारणाने रिक्त झाल्यानंतर व्यपगत समजण्यांत येवुन भरता येणार नाही असे स्पष्टपणे आदेशात नमूद केलेले आहे.

११. कोर्ट केस ३०५ मधील कर्मचा-यांना मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडील आदेश क्र. न. पा. २/१/ का वि/१०५५/०२ दिनांक ३१-१०-२००२ रोजी मनपा सेवेत सामावुन घेण्यास मान्यता दिलेली आहे. परंतु ही पदे सेवानिवृत्ती व इतर कोणत्याही कारणाने रिक्त झाल्यानंतर सदरची पदे व्यपगत समजण्यांत येवुन भरता येणार नाही असे स्पष्टपणे आदेशात नमूद केलेले आहे.

१२.कायम आस्थापना वरील विविध पदे अशी १२८ पदे व्यपगत झालेली आहेत पर्यायाने त्यांचा वेतनावरील खर्च कमी झालेला आहे.

१३. उपरोक्त कोर्ट केस मधील कर्मचारी संख्या कालातंराने कमी होणार आहे व पुन्हा भरली जाणार नाहीत त्यामुळे सदर पदावरील खर्च हा कमी होवुन पर्यायाने आस्थापना खर्चात घट होत जाणार आहे.

१४.उपरोक्त मा. शासन निर्णय दिनांक २७ फ़ेब्रुवारी २००९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर शिफ़ारशी स्विकृत केल्यानुसार आस्थापना वेतन खर्चामध्ये दरमहा रुपये ५४,२५,०००/- इतकी वाढ अपेक्षित आहे.

आस्थापना खर्चासाठी (वेतनासाठी) मनपा अंदाजपत्रक सन २००९-२०१० मध्ये रु. ९,७२,५२,०००/- इतकी तरतुद केलेली आहे.

१५.सहाव्या वेतन आयोगाच्या शिफ़ारशीनुसार मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी २००६ पासुन सहावा वेतन आयोगाच्या शिफ़ारशी लागु केल्याने आज अखेर सुधारीत वेतनानुसार कर्मचा-यांना उपरोक्त शासन निर्णय दिनांक २७-२-२००९ नुसार फ़रक अदा करावा लागेल. सदरचा फ़रक पुढील पाच वर्षात समान हप्त्यांत भविष्य निर्वाह निधीत जमा करावा लागेल. जमा केलेली रक्कम जमा केल्याच्या दिनांकापासुन पाच वर्ष काढुन घेता येणार नाही.

१६. सहाव्या वेतन आयोगाच्या शिफ़ारशी लागु केल्यानंतर घरभाडे भत्ता व वाहतुक भत्ता या बाबी शासन स्तरावर प्रलंबित आहेत. शासनाकडुन आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार घरभाडे भत्ता व वाहतुक भत्ता मनपा कर्मचा-यांना लागु करणे संयुक्तिक होईल.

१७. पाचव्या वेतन आयोगाच्या शिफ़ारशीनुसार महागाई भत्यावर दिनांक १-१-२००६ ते ३०-६-२००७ अखेर ६६.६७% इतक्या दराने अनुदान प्राप्त होत होते. दिनांक १-७-२००७ ते ३०-६-२००८ अखेर महागाई भत्ता ३३.३३% इतक्या दराने अनुदान प्राप्त होत होते.

उपरोक्त नुसार मा. शासनाकडुन सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्यानंतर अनुदान प्राप्त झाल्यास आस्थापना खर्च कमी होवु शकतो.

१८. सहावा वेतन आयोगाच्या शिफ़ारशी दिनांक १-१-२००६ पासुन लागु केल्यानंतर १-१-२००६ पासुन वेळोवेळी लागु करण्यांत आलेला / येणारा महागाई भत्त्याच्या दराने महागाई भत्ता मनपा कर्मचा-यांना देखील लागु होईल.

१९. सन २००८-२००९ मध्ये आस्थापना खर्चाची टक्केवारी ५७.६० % इतकी झालेली आहे.

२०.अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २००९-१० मध्ये अंदाजपत्रकीय तरतुदी मध्ये ६ व्या वेतन आयोगाच्या फ़रकासाठी रुपये २,५५,००,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी पंचावन्न लाख मात्र) इतकी तरतुद करण्यांत आलेली आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता व शासन निर्णय दिनांक २७-२-२००९ नुसार राज्य वेतन सुधारणा समिती २००८ च्या शिफ़ारशी मनपा कर्मचारी यांना दिनांक १ जानेवारी २००६ पासुन लागु करणे व दिनांक १-४-२००९ (माहे एप्रिल पेड इन मे) च्या वेतनात अदा करण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महानगरपालिका सभेपुढे निर्णयास्तव सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र शासन, वित्तविभाग मंत्रालय मुंबई, यांची अधिसूचना दिनांक २३ एप्रिल २००९ अन्वये दिनांक १ जानेवारी २००६ पासून शासकीय कर्मचा-यांना ६ वा वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्या आहेत. त्याबाबत खालील अभिप्राय देण्यांत येत आहेत.

(१) सध्या महानगरपालिकेस खालील प्रमाणे दि.३०/०४/२००९ अखेर थकित देणी व हिस्सा भरणे बाकी आहे.

| | |
|---|---|
| अ) मूलभुत सुविधा विकास निधी | ५.७४ कोटी |
| ब) UIDSSMT हिस्सा | ०.९९ कोटी |
| क) ठेकेदार देयके (दि.३०/४/०९ अखेर) | ९.३७ कोटी. |
| ड) पुरवठादार देयके | ०.९४ कोटी. |
| इ) शिक्षण मंडळ ५०% वर्गणी | १.४० कोटी. |
| | ----------- |
| एकुण रु. | १८.४४ कोटी. |

सदर रक्कम अदा करणेसाठी निधी उपलब्ध नाही.

(२) कर्मचा-यांच्या वेतनावर माहे एप्रिल ०९ मध्ये रु.२,१९,४०,३४५/- इतका खर्च झाला आहे. २०% वाढ गृहीत धरल्यास दरमहा रु.२.६४ कोटी इतका खर्च वेतनावर होईल. म्हणजेच वेतनावर दरमहा रु.४५ ते ५० लाख इतका अतिरिक्त बोजा पडणार आहे.

(३) माहे एप्रिल ०९ चे सेवानिवृत्तीवेतन ५०,९५,९२९/- अदा केले आहे. सेवानिवृत्ती वेतनावर २०% वाढ गृहीत धरल्यास दरमहा रु.६२.०० लाख अदा करावे लागतील म्हणजेच दरमहा रु.१२.०० लाख अतिरिक्त बोजा पडणार आहे.

(४) या व्यतिरिक्त दोन महिन्याच्या मूळ वेतनाच्या दुप्पट रक्कम अग्रीम म्हणुन अदा केल्यास अग्रिमापोटी २.५५ कोटी अदा करावे लागणार आहेत. अंदाजपत्रकात जरी २.५५ कोटी रक्कमेची तरतूद केली असली तरी प्रत्यक्ष रक्कम अदा करणेसाठी निधी उपलब्ध होणार नाही.

(५) सेवानिवृत्तीवेतन धारकांना २ महिन्याची मूळ पेन्शन अदा करणेसाठी (अग्रिमापोटी) रु.५०.०० लाख अंदाजे लागणार आहेत. अंदाजपत्रकात सन ०९-१० साठी रु.७०.०० लाख इतकी तरतूद केली आहे. तथापि प्रत्यक्ष निधी उपलब्ध होणार नाही.

सन ०९-१० च्या अंदाजपत्रकात (माहे एप्रिल ०९ ते जुलै ०९) रु. ९.७२ कोटी इतकी तरतूद वेतनासाठी सर्व विभाग मिळून कायम पदांसाठी केली आहे. जुलै ०९ नंतर यथावकाश आस्थापना खर्चात सुधारित अंदाजपत्रकाच्या वेळी आवश्यक ती वाढ करता येईल.

सध्या फरकाची रक्कम देता येणार नाही. सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करुन दरमहा वेतनात अदा करणेसाठी मा.महासभेची मान्यता घेणे संयुक्तीक राहील.

संकलित कर व पाणीपट्टीची थकीत रक्कम ०८-०९ अखेर १११.०० कोटी अंदाजे दिसुन येते. सदर थकबाकीच्या २५% रक्कम वसूल झाल्यास वरील सर्व देणी, ठेकेदार, फरकाच्या रकमा मनपा हिस्सा इ. देणे शक्य होईल.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावितनुसार महाराष्ट्र शासनाचे परिपत्रकानुसार सहावा वेतन आयोग महानगरपालिका कर्मचा-यांना लागू करणेसाठी मा.महासभेसमोर ठेवुन यथावकाश निर्णय घेणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साो, यांचा अभिप्राय की, मालमत्ता कर, पाणीपट्टी अन्य महानगरपालिकेच्या थकीत रक्कमांची ८० % वसूली होईपर्यंत व प्रलंबीत मालमत्ता थकबाकी बाबत न्यायप्रविष्ट प्रकरणांची सुध्दा वसूली होणे आवश्यक आहे. याबाबत महासभेवर निर्णय घेणे योग्य.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त साो, मा.उपायुक्त (सा), मुख्यलेखाधिकारी, अंतर्गत लेखापरीक्षक यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

---*---

दिनांक २१/०८/२००९ रोजी दुपारी १-०० वाजता विषय पत्रिकेत नमुद केलेल्या विषयाबाबत महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. मा.महापौरांच्या अध्यक्षतेखाली सभा सुरु होणार तोच मा.श्री.संजय चोपडा, मा.श्री.शिवाजी लोंढे, मा.श्री.जसपालसिंग पंजाबी , मा.श्रीमती.संगिता खरमाळे व इतर भारतीय जनता पार्टी व शिवसेना पक्षाचे नगरसेवक (दिनांक २०/०८/२००९ रोजी धार्मिक स्थळाच्या बांधकामा बाबत झालेल्या गैरप्रकाराचे ) हातात फलक घेवून सभागृहात घोषणाबाजी करत हजर झाले. नंतर राष्ट्रगीत झाल्यानंतर मा.महापौर साहेब, यांनी विषय वाचण्यास सांगीतले.

दुखवटयाचा प्रस्ताव वाचन झाल्यानंतर मृत व्यक्तींच्या प्रती २ मिनीटे उभे राहुन श्रंध्दाजली वाहण्यात आली.

मा.श्री.अरुण काका जगताप :- पुढील विषय घेण्यांत यावा. विषय वाचन पुर्ण झाल्यानंतर.

मा.श्री.संदीप कोतकर :- आजच्या सर्वसाधारण सभेपुढे कर्मचा-यांच्या ६ व्या वेतन आयोगाचा विषय घेतल्या बद्दल मी प्रथम मा.महापौरांचे आभार मानतो. वाढत्या महागाई मुळे कर्मचा-यांना ६ वा वेतन आयोग लागु करणे आवश्यक होते. मा.महाराष्ट्र शासनाने शासकीय कर्मचा-यांना व सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना ज्या प्रमाणे ६ वा वेतन आयोगाच्या शिफारशी लागु केलेल्या आहेत, त्या पध्दतीने आपल्या सर्व कर्मचा-यांनाही तो लागु करावा.शासनाने वेळोवेळी पारीत केलेले निर्णय व आस्थापना विभागाकडील प्रस्तावानुसार दिनांक ०१/०१/२००६ पासून सहावा वेतन आयोग देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. माहे सप्टेंबर २००९ पेड इन माहे आक्टोबर २००९ चे वेतन सहाव्या वेतन आयोगानुसार देण्यात यावे.

मा.श्री.शेख आरीफ रफीउद्दीन :- माजी महापौर श्री.संदीप कोतकर यांनी जी सूचना मांडली तीला मी अनुमोदन करतो.

मा.श्री.अरुण काका जगताप :- विषय मंजूर.

---*---

**ठराव :-** महाराष्ट्र शासन वित्त विभाग मंत्रालय मुंबई यांनी दिनांक २२ एप्रिल २००९ रोजीची अधिसूचना व महाराष्ट्र नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १००९/प्र.क्र.३५५/नवि-२६ दिनांक १० ऑगष्ट २००९ मधील अटी विचारात घेवुन तसेच महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती पाहून अहमदनगर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील मंजूर पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना माहे सप्टेंबर २००९ पेड इन ऑक्टोबर २००९ पासून सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित दराने वेतन तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. आस्थापना विभागाने दिनांक १ जानेवारी २००६ रोजी कर्मचा-यांचे असलेले मूळ वेतन विचारात घेवुन वेतननिश्चिती करुन पुढील आवश्यक कार्यवाही सप्टेंबर २००९ मध्ये पूर्ण करावी. तसेंच सेवानिवृत्त कर्मचा-यांचे वेतननिश्चिती बाबत अर्थ विभागाने आवश्यक ती कार्यवाही पुर्ण करावी. वेतननिश्चिती करतांना लेखा परिक्षणाच्या दृष्टीने आक्षेप निर्माण होणार नाही या बाबत दक्षता घेण्यांत यावी. आर्थिक परिस्थिती व उत्पन्नाचे स्त्रोत या बाबीचा विचार करुन महानगरपालिका पदाधिकारी / अधिकारी व युनियन प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेवुन सहावे वेतनापोटी द्यावयाच्या फरकाची थकीत रक्कम टप्प्याटप्याने अदा करणे बाबत निश्चित धोरण ठरविण्यात यावे.

सुचक : मा.श्री.कोतकर संदीप भानुदास.

अनुमोदक : मा.श्री.शेख आरीफ रफीउद्दीन.

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २९** **दिनांक : २१/०८/२००९.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या पिंपळगांव तलाव येथील जागेमध्ये खाजगी करणाच्या माध्यमातुन नौकानयन सुरु करणे व त्याकरीता निविदा मागविणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.आयुक्त यांनी दिनांक ३०/०१/२००९ रोजी दिलेल्या सुचनाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे अहवाल सादर करीत आहे.

१) विषयांकित तलाव BOT तत्वावर " मनोरंजननगरी " इत्यादी वापरासाठी विकसित करण्याचा ठराव मा.महासभेने प्रस्ताव क्र.४ दिनांक २७/१२/२००७ अन्वये मंजूर केलेला आहे. त्या अनुषंगाने या प्रकारची सेवा देण्याचा मान्यवर संस्थाकडून " Expression of Interest " राज्यपातळीवरील वर्तमान पत्रामध्ये मोठया प्रमाणावर प्रसिध्दी देवून मागविण्यात आले होते. त्यास अंशतः प्रतिसाद देखिल मिळाला होता.

२) मध्यंतरीच्या काळात तलावाखालील संपूर्ण जमिन नाव लावणेसाठी महसूल विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. मात्र संपूर्ण क्षेत्रावर (तलाव व त्यालगतची जमिन) नाव लावणेसाठी अद्याप यश आलेले नाही त्यास आणखी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

३) मुद्दा क्रमांक २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे महसूली विभागाकडेस नाव लागण्याची प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात अर्जदार यांनी केलेली मागणी प्रमाणे तलावात नौकानयन सुरु करण्यास हरकत नाही. नौकानयन इत्यादी सुविधा निर्माण करणे हा मुळ धोरणाचाच भाग असल्याने असे नौकानयन सुरु करण्यास हरकत नाही. असे मत आहे. यासाठी खालील प्रमाणे प्रक्रीया अंवलंबावी लागेल.

अ) विषयांकित मुळ प्रस्तावास मा.महासभेची मान्यता असलेने हा प्रस्ताव मा.महासभेकडे पुन्हा या कारणासाठी सादर करण्याची आवश्यकता नाही. तथापि याबाबतचे सुसंगत धोरण ठरविण्यासाठी व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७९ क व ड प्रमाणे नौकानयनासाठी आकारावयाच्या भाड्यासाठी हा प्रस्ताव मा.महासभेस सादर करणे आवश्यक आहे. हे भाडे खालील प्रमाणे ठरविणे योग्य होईल.

१. अशा प्रकारचे मूल्यांकन जमिनीच्या किंमतीवर आधारीत न ठेवता ते नफा तत्वावर (Proffit Methed of Valuation) करणे योग्य होईल.

२. प्रत्यक्ष माहिती घेतली असता अशा मोटार बोटीतुन फेरीसाठी सुमारे २० ते ५० रुपये इतके शुल्क प्रतिमाणशी आकारले जाते. सुट्टीच्या दिवशी नागरिकांची संख्या जादा असली तरी इतर दिवशी (Working days) ही संख्या निश्चितच खूप कमी राहणार आहे. सबब सुमारे ५०० नागरिक प्रतिमहिना या नौकानयनाचा लाभ घेतील अशी अपेक्षा आहे. यातुन ठेकेदारास रु.२५,०००/- इतके मासिक शुल्क मिळेल. ठेकेदाराचा खर्च वजा जाता त्यास निव्वळ नफा रु.१०,०००/- प्रति महिना एवढे मिळेल म्हणजेच वार्षिक रु.१,२०,०००/- एवढे उत्पन्न मिळेल तलाव महानगरपालिकेच्या मालकीचा असलेने या निव्वळ तळयाच्या ५०% नफा महानगरपालिकेस मिळणे आवश्यक आहे.

सबब या नौकानयनासाठी ठेकेदाराकडुन रु.६०,०००/- (साठ हजार मात्र) प्रतिवर्ष इतकी किमान देकार रक्कम ठेवून निविदा काढणे योग्य होईल.

३. महानगरपालिकेच्या ठिकाणी मोठया स्वरुपाचा मनोरंजन नगरी प्रस्ताव राबविणेबाबत धोरणात्मक निर्णय झालेलाच आहे. त्याच्याशी सुसंगतच हा प्रकार आहे. हा प्रकल्प राबविल्यामुळे मुळ धोरणाची अंशतः अंमलबजावणी सुरु होईल. त्यामुळे या प्रकल्पास मान्यता देणेस हरकत नाही.

४. वरील प्रमाणे भाडे ठरल्यानंतर याकामी जाहीर निविदा मागवून अशा निविदांना मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक राहील.

५. निविदा काढताना निविदाधारकास खालीलप्रमाणे अटी घालणे आवश्यक राहील.

१) नौकानयन करतांना नागरिकांच्या जिवीताची हमी निविदा धारकास घ्यावी लागेल. आवश्यक ते सुरक्षा कर्मचारी, Life Jaekets इत्यादी सुविधा पुरविणे निविदा धारकास बंधनकारक राहील. काही अनुचित घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदा धारकावर राहील. त्याने योग्य ती नुकसान भरपाई देखील स्वतः भरावयाची आहे.

२) नौकानयन प्रकल्पामुळे पर्यावरणास (पक्षी, झाडे इ.) कोणतीही हानी होणार नाही याची दक्षता निविदा धारकाने घ्यावयाची आहे.

३) नौकानयन प्रकल्पालाही तलावालगतची महानगरपालिका मालकीची जमिन उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

४) नौकांची संख्या महानगरपालिका ठरवील त्याप्रमाणे राहील.

वरील प्रमाणे ठेका हा सुरुवातीस फक्त एक वर्षाकरीता किंवा महानगरपालिका एक महिन्याची पूर्वसूचना देईल अशा कालावधीपर्यंत (यापैकी जे आधी घडेल ते) राहील.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित पाहता चर्चा करुन निर्णय घेणेसाठी मा.महासभेसमोर ठेवून निर्णय घेणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साो, यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त साो, मा.उपायुक्त (सा) यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

---*---

चर्चा :- चर्चा नाही.

ठराव :- ऑफिस रिपोर्ट मंजूर. सदर कामी निविदा मागविणेत याव्यात तदनुषंगिक खर्च मंजूर.
नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.शेख आरीफ रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.श्री.गव्हाळे विजय नाना.
ठराव बहुमताने मंजूर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : ३०** **दिनांक : २१/०८/२००९.**

---

**प्रस्तावाचा विषय :** विकास योजना अहमदनगर (वाढीव क्षेत्र), मुकुंदनगर, मौजे भिंगार सर्व्हे नंबर ३२९/१ मधील विद्यमान बाबे आखेरत कब्रस्तान विकास योजना नकाशात दर्शविणे तसेच मा.सर्वश्री.हाजी शेख नजीर मोहम्मद नसीर, उपमहापौर, मा.श्री.संजय गाडे, सभापती स्थायी समिती, शेख अय्युब चाँद, खान समद वहाब मा.सदस्य व मुकुंदनगर येथील नागरिकांचे निवेदन बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर शहराच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र व प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३० नुसार दिनांक १३/०७/२००९ रोजी मा.शासनाकडे सादर करण्यात आलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेस अल्पसंख्यांकाच्या विकास निधी अंतर्गत रु.२० लक्ष इतका निधी प्राप्त झालेला आहे. या निधी अंतर्गत अल्पसंख्य समाजाच्या कल्याणकारी योजनेसाठी कामे करावयाची आहेत. या कामांबाबत चर्चा करताना काही सन्माननीय नगरसेवकांनी बाबे आखेरत कब्रस्तान विकसीत करावयाची कल्पना मांडली. या प्रस्तावाचा विकास योजनेच्या दृष्टीकोनातुन विचार केला असता, हे विद्यमान कब्रस्तान, आरक्षण क्र.११४ " खेळाचे मैदान " , या प्रस्तावाने बाधित होत असल्याची वस्तुस्थिती समोर आली. आरक्षणाने बाधित होत असल्याने या कब्रस्तानावर खर्च करता येणार नाही. व त्यासाठी हे विद्यमान कब्रस्तान प्रथम आरक्षणातुन वगळणे आवश्यक आहे. ही बाब नगररचनाकार यांनी मा.महापौर, मा.उपमहापौर व उपस्थित सन्माननीय नगरसेवक यांच्या निदर्शनास आणली.

वरील वस्तुस्थिती लक्षात आल्यानंतर मा.उपमहापौर यांनी विद्यमान दफनभुमी वरील आरक्षण वगळणे बाबत व या दफन भुमीच्या भविष्यातील वाढीसाठी या दफनभुमी शेजारील अतिरीक्त जागा दफनभुमीसाठी दर्शविणे बाबत संदर्भिय पत्रान्वये यादी दिलेली आहे.

यादी सोबत जोडलेल्या कागदपत्राची तपासणी केली असता हे कब्रस्तान विद्यमान असुन त्याच संस्थेच्या नावाने सात-बारा उतारा असल्याचे दिसते. तसेच या संस्थेस म्हणजेच " बाबे आखेरात कब्रस्तान " यास महाराष्ट्राचे वक्फ बोर्डाची मान्यता असल्याचे दिसते तसेच त्यांनी पुर्वी ही जागा कब्रस्तानसाठी दर्शविणे बाबत मागणी नियोजन समितीस केल्याचे दिसते.

मा.उपमहापौर यांनी दिलेली यादी वस्तुस्थितीस धरुन आहे. त्यामुळे मा.शासनास सादर केलेल्या वाढीव क्षेत्र विकास योजनेत खालील प्रमाणे बदल करणे योग्य होईल.

अ) सोबत दर्शविलेल्या नकाशा प्रमाणे आरक्षण क्र.११४ चिल्ड्रन प्ले ग्राउंड या आरक्षणाचा उत्तरेकडील ०.४५ हेक्टर इतका भाग वगळुन तो विद्यमान दफनभुमी म्हणुन दर्शवावा.

ब) या दफनभुमीच्या पुर्वेकडील सुमारे ०.५० हेक्टर इतकी जमिन विद्यमान दफनभुमीच्या विस्तारासाठी आरक्षण क्र. ११७ व्दारे आरक्षित करावी.

क) सध्याचे विकास योजनेत मौजे भिंगार स.नं.३३१ या जागेवर दर्शविलेली स्मशानभुमी व दफनभुमीची आरक्षणे वगळण्यात यावीत.

आता उपरोक्त विकास योजना मा.शासनास मंजुरीसाठी सादर करण्यात आलेली आहे. त्यामुळे या प्रस्तावास मा.महासभेची मंजुरी घेऊनच तसा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविणे योग्य होईल. सबब हा प्रस्ताव मा.महासभेच्या मंजुरीसाठी सादर करणे योग्य होईल.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित मा.महासभेकडे पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त सो, मा.उपायुक्त (सा) यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**---*---**

**चर्चा :-** चर्चा नाही. सभागृहात गोंधळाची परिस्थिती तथापि मा.श्री.शेख नजीर मोहमद नसीर, उपमहापौर यांनी दिलेल्या पत्राची नोंद घेणेंत यावी.

**---*---**

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट व मा.हाजी शेख नजीर मोहंमद नसीर, उपमहापौर यांनी सभा सुरु असतांना दिलेल्या पत्राप्रमाणे प्रस्ताव मंजुर. अहमदनगर शहराच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेतील आरक्षण क्र.११४ ' खेळाचे मैदान ' या प्रस्तावाने बाधीत होणारे विद्यमान कब्रस्तान ' खेळाचे मैदान ' या आरक्षणातुन वगळुन त्या ठिकाणी विद्यमान कब्रस्तान असा उल्लेख करावा. तसेच या विद्यमान कब्रस्थानाच्या पुर्वेस सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे कब्रस्तानाच्या वाढीव जागेसाठी हे आरक्षण दर्शवावे व त्याच्या पुर्वेस १२.० मी. रुंद रस्त्यापर्यंत स्मशानभुमी हे आरक्षण टाकावे.

तसेच मा.उपमहापौर हाजी शेख नजीर मोहंमद नसीर यांनी सुचविल्याप्रमाणे भिंगार स.नं.३३१ या जागेवरील विकास योजनेत दर्शविलेली दफनभुमी व स्मशानभूमी ह्या आरक्षणांचा हेतु बदलुन ' खेळाचे मैदान ' हे आरक्षण प्रस्तावित करावे.

आता अहमदनगर महानगरपालिकेने वाढीव हद्दीची विकास योजना मा.शासनास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३० अन्वये दिनांक १३/०७/२००९ रोजी सादर केलेली आहे. त्यामुळे मा.शासनाने या विकास योजनेस कलम ३१ अन्वये मंजुरी देतांना या प्रस्तावाचा विचार करावा. अशी शिफारस करण्यात येत आहे.

सुचक :- मा.श्री.संजय बाबुराव गाडे.

अनुमोदक :- मा.श्री.शेख अय्युब चाँद.

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**चर्चा :-**

दिनांक २१/०८/२००९ रोजी दुपारी १-०० वाजता विषय पत्रिकेत नमुद केलेल्या विषयाबाबत महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. मा.महापौरांच्या अध्यक्षतेखाली सभा सुरु होणार तोच मा.श्री.संजय चोपडा, मा.श्री.शिवाजी लोंढे, मा.श्री.जसपालसिंग पंजाबी , मा.श्रीमती.संगिता खरमाळे व इतर भारतीय जनता पार्टी व शिवसेना पक्षाचे नगरसेवक (दिनांक २०/०८/२००९ रोजी धार्मिक स्थळाच्या बांधकामा बाबत झालेल्या गैरप्रकाराचे ) हातात फलक घेवून सभागृहात घोषणाबाजी करत हजर झाले. नंतर राष्ट्रगीत झाल्यानंतर मा.महापौर साहेब, यांनी विषय वाचण्यास सांगीतले.

दुखवटयाचा प्रस्ताव वाचन झाल्यानंतर मृत व्यक्तींच्या प्रती २ मिनीटे उभे राहुन श्रंध्दाजली वाहण्यात आली.

मा.श्री.अरुण काका जगताप :- पुढील विषय घेण्यांत यावा. विषय वाचन पुर्ण झाल्यानंतर.

मा.श्री.संदीप कोतकर :- आजच्या सर्वसाधारण सभेपुढे कर्मचा-यांच्या ६ व्या वेतन आयोगाचा विषय घेतल्या बद्दल मी प्रथम मा.महापौरांचे आभार मानतो. वाढत्या महागाई मुळे कर्मचा-यांना ६ वा वेतन आयोग लागु करणे आवश्यक होते. मा.महाराष्ट्र शासनाने शासकीय कर्मचा-यांना व सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना ज्या प्रमाणे ६ वा वेतन आयोगाच्या शिफारशी लागु केलेल्या आहेत,त्या पध्दतीने आपल्या सर्व कर्मचा-यांनाही तो लागु करावा.शासनाने वेळोवेळी पारीत केलेले निर्णय व आस्थापना विभागाकडील प्रस्तावानुसार दिनांक ०१/०१/२००६ पासून सहावा वेतन आयोग देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. माहे सप्टेंबर २००९ पेड इन माहे आक्टोबर २००९ चे वेतन सहाव्या वेतन आयोगानुसार देण्यात यावे.

मा.श्री.शेख आरीफ रफीउद्दीन :- माजी महापौर श्री.संदीप कोतकर यांनी जी सूचना मांडली तीला मी अनुमोदन करतो.

मा.श्री.अरुण काका जगताप :- विषय मंजूर.

विषय क्रमांक २ व ३ वर चर्चा नाही.

मा.श्री.अरुण काका जगताप, मा.श्री.संजय बाबुराव गाडे, मा.श्री.शेख आरीफ रफीउद्दीन - विषय मंजूर.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २८** **दिनांक : २१ /०८/२००९.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** राज्य वेतन सुधारणा समिती २००८ शिफारशी स्विकृत करणे बाबत मा.सर्वश्री.संजय बाबुराव गाडे,सभापती, स्थायी समिती, बाळासाहेब रेवजी पवार, पोपटराव जगन्नाथ बारस्कर, सौ.रजनी अरविंद शिंदे, सुभाष सोपानराव लोंढे, अनिल गणपत शेकटकर मोहन भागवत कदम, सुरेश नारायण आंबेकर, सौ.सोनाबाई शिंदे सभापती महिला व बालकल्याण समिती, सौ.स्मिता ठाकर उपसभापती महिला व बालकल्याण समिती, गणेश उर्फ उमेश कवडे, सौ.मुक्ताबाई मिसाळ, श्रीमती.गंभीर इंदरकौर, शेंडगे संजय इत्यादी मा.सदस्य यांनी दिलेल्या यादीप्रमाणे प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**ठराव :-** महाराष्ट्र शासन वित्त विभाग मंत्रालय मुंबई यांनी दिनांक २२ एप्रिल २००९ रोजीची अधिसूचना व महाराष्ट्र नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १००९/प्र.क्र.३५५/नवि-२६ दिनांक १० ऑगष्ट २००९ मधील अटी विचारात घेवुन तसेच महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती पाहून अहमदनगर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील मंजूर पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना माहे सप्टेंबर २००९ पेड इन ऑक्टोबर २००९ पासून सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित दराने वेतन तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. आस्थापना विभागाने दिनांक १ जानेवारी २००६ रोजी कर्मचा-यांचे असलेले मूळ वेतन विचारात घेवुन वेतननिश्चिती करुन पुढील आवश्यक कार्यवाही सप्टेंबर २००९ मध्ये पूर्ण करावी. तसेंच सेवानिवृत्त कर्मचा-यांचे वेतननिश्चिती बाबत अर्थ विभागाने आवश्यक ती कार्यवाही पुर्ण करावी. वेतननिश्चिती करतांना लेखा परिक्षणाच्या दृष्टीने आक्षेप निर्माण होणार नाही या बाबत दक्षता घेण्यांत यावी. आर्थिक परिस्थिती व उत्पन्नाचे स्त्रोत या बाबीचा विचार करुन महानगरपालिका पदाधिकारी / अधिकारी व युनियन प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेवुन सहावे वेतनापोटी द्यावयाच्या फरकाची थकीत रक्कम टप्प्याटप्याने अदा करणे बाबत निश्‍चित धोरण ठरविण्यात यावे.

सुचक : मा.श्री.कोतकर संदीप भानुदास.

अनुमोदक : मा.श्री.शेख आरीफ रफीउद्दीन.

ठराव बहुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २९** **दिनांक : २१/०८/२००९.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या पिंपळगांव तलाव येथील जागेमध्ये खाजगी करणाच्या माध्यमातुन नौकानयन सुरु करणे व त्याकरीता निविदा मागविणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर. सदर कामी निविदा मागविणेत याव्यात तदनुषंगिक खर्च मंजूर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.शेख आरीफ रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.श्री.गव्हाळे विजय नाना.

ठराव बहुमताने मंजूर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ३०** **दिनांक : २१/०८/२००९.**

---

**प्रस्तावाचा विषय :** विकास योजना अहमदनगर (वाढीव क्षेत्र), मुकुंदनगर, मौजे भिंगार सर्व्हे नंबर ३२९/१ मधील विद्यमान बाबे आखेरत कब्रस्तान विकास योजना नकाशात दर्शविणे तसेच मा.सर्वश्री.हाजी शेख नजीर मोहम्मद नसीर, उपमहापौर, मा.श्री.संजय गाडे, सभापती स्थायी समिती, शेख अय्युब चाँद, खान समद वहाब मा.सदस्य व मुकुंदनगर येथील नागरिकांचे निवेदन बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट व मा.हाजी शेख नजीर मोहंमद नसीर, उपमहापौर यांनी सभा सुरु असतांना दिलेल्या पत्राप्रमाणे प्रस्ताव मंजुर. अहमदनगर शहराच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेतील आरक्षण क्र.११४ ' खेळाचे मैदान ' या प्रस्तावाने बाधीत होणारे विद्यमान कब्रस्तान ' खेळाचे मैदान ' या आरक्षणातुन वगळुन त्या ठिकाणी विद्यमान कब्रस्तान असा उल्लेख करावा. तसेच या विद्यमान कब्रस्थानाच्या पुर्वेस सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे कब्रस्तानाच्या वाढीव जागेसाठी हे आरक्षण दर्शवावे व त्याच्या पुर्वेस १२.० मी. रुंद रस्त्यापर्यंत स्मशानभुमी हे आरक्षण टाकावे.

तसेच मा.उपमहापौर हाजी शेख नजीर मोहंमद नसीर यांनी सुचविल्याप्रमाणे भिंगार स.नं.३३१ या जागेवरील विकास योजनेत दर्शविलेली दफनभुमी व स्मशानभूमी ह्या आरक्षणांचा हेतु बदलुन ' खेळाचे मैदान ' हे आरक्षण प्रस्तावित करावे.

आता अहमदनगर महानगरपालिकेने वाढीव हद्दीची विकास योजना मा.शासनास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३० अन्वये दिनांक १३/०७/२००९ रोजी सादर केलेली आहे. त्यामुळे मा.शासनाने या विकास योजनेस कलम ३१ अन्वये मंजुरी देतांना या प्रस्तावाचा विचार करावा. अशी शिफारस करण्यात येत आहे.

सुचक :- मा.श्री.संजय बाबुराव गाडे.

अनुमोदक :- मा.श्री.शेख अय्युब चाँद.

ठराव बहुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.